<table>
<tr><td rowspan="5">MHRT140001852024</td><td>दाखल दिनांक</td><td>:-</td><td colspan="3">०१/१०/२०२४</td></tr>
<tr><td>नोंदणी दिनांक</td><td>:-</td><td colspan="3">०१/१०/२०२४</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td>:-</td><td colspan="3">३१/०७/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td rowspan="2">:-</td><td>वर्षे</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०१</td><td>०९</td><td>३०</td></tr>
</table>

<u>भाग 'अ'</u>

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i) )

**मंडणगड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

**[अमृता चा. जोशी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर]**

**[जाहीर दिनांक ३१/०७/२०२६]**

**निशाणी क्र.०९ लगत**

| | |
|---|---|
| खटला क्रमांक :- | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१०६/२०२४** |
| गुन्हा रजि. क्रमांक व पोलीस ठाणे :- | **गुन्हा रजि. क्र.९८/२०२४**<br>**राज्य उत्पादन शुल्क, खेड विभाग, रत्नागिरी.** |
| फिर्यादी :- | **महाराष्ट्र शासन करीता**<br>**निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खेड विभाग, रत्नागिरी.** |
| प्रतिनिधीत्व:- | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. नाईक.** |
| आरोपी:- | **जयश्री जनार्दन कदम,**<br>वय - ५८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी,<br>रा. मौजे कादवण, वखारवाडी,<br>ता. मंडणगड, जि. रत्नागिरी. |
| प्रतिनिधीत्व :- | **विधिज्ञ श्री. ए. ए. बैकर** |

<u>- भाग 'ब' -</u>

<u>(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii) )</u>

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | २९/०५/२०२४ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झालेचा दिनांक | २९/०५/२०२४ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | ०१/१०/२०२४ |
| आरोपीविरुध्द अपराधाचा तपशील ठेवलेचा दिनांक | १६/०७/२०२४ |

| | |
|---|---|
| पुरावा नोंदविणेस प्रारंभ झालेचा दिनांक | ०८/०८/२०२५ |
| न्यायनिर्णयाचा आरक्षीत दिनांक | लागू नाही. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | **३१/०७/२०२६** |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाचा दिनांक | लागू नाही. |

**आरोपीचा तपशील**

| **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामीनावर खुले केलेची तारीख** | **दोषारोप ठेवलेले गुन्हे** | **निर्दोष मुक्त किंवा शिक्षा** | **दिलेली शिक्षा** | **फौ.प्र.सं.क. ४२८ अन्वये स्थानबध्दता भोगलेचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|
| जयश्री जनार्दन कदम | भा.ना.सु.सं.क. ३५(३) नुसार आरोपीस नोटीस दिलेने आरोपीस अटक नाही. | लागू नाही. | महाराष्ट्र दारुबंदी अधि. कलम ६५(ई) | निर्दोष मुक्त केले. | लागु नाही | लागु नाही. |

**भाग क**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/ आरोपीतर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार**

| **साक्षीदार क्र.** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | वैभव विनोद राणे | पंच | ०९ लगत |
| अ.सा.क्र.२ | जितेंद्र रजनीकांत पाटील | पंच | ०९ लगत |
| अ.सा.क्र.३ | राजेंद्र भागोजी भालेकर | फिर्यादी | ०९ लगत |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार – नाही.**

**क. न्यायालयीन साक्षीदार – नाही.**

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा –**

| अ.क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | नि.क्र.पी.१५/अ.सा.क्र.०३ | फिर्याद |
| २ | नि.०८ लगत | रासायनिक विश्लेषण अहवाल |

**ब. <u>आरोपीतर्फे पुरावा</u> — नाही.**

**क. <u>न्यायालयीन पुरावा</u> — नाही.**

**ड. <u>मुद्देमाल</u> —**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | ३५ लीटर मापाचे दोन प्लॅस्टीक कॅन त्यामध्ये ३० लीटर गावठी हातभट्टी दारू अशी एकूण ६० लीटर दारू, १५ लीटर मापाचे बरणीमध्ये १० लीटर दारू, सहा काचेचे ग्लास व एक प्लॅस्टीक बादली |

## <u>न्या य नि र्ण य</u>

**(जाहीर दिनांक — ३१ जुलै, २०२६)**

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५(ई) अन्वये दाखल करणेत आलेला आहे.

**<u>अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :**

**२.** दि.२९/०५/२०२४ रोजी फिर्यादी राजेंद्र भागोजी भालेकर, जवान राज्य उत्पादन शुल्क, खेड यांनी इतर कार्यालयीन कर्मचारी यांचेसमवेत असताना, मौजे कादवण वखरवाडी येथे आरोपीचे राहते घराचे मागे मोकळ्या पडवीत, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथे छापा टाकला असता एक महिला तिचे कब्जात सुमारे ३५ लीटर मापाचे दोन प्लॅस्टीक कॅन त्यामध्ये ३० लीटर गावठी हातभट्टी दारू अशी एकूण ६० लीटर दारू, १५ लीटर मापाचे बरणीमध्ये १० लीटर दारू, सहा काचेचे ग्लास व एक प्लॅस्टीक बादली हा मुद्देमाल चोरटा दारु

विक्रीचा व्यवसाय करणेच्या उद्देशाने बाळगलेल्या अवस्थेत मिळून आली. त्यानंतर त्यांनी त्या मुद्देमालापैकी प्रत्येकी दोन बाटल्या रासायनिक पृथ:क्करणासाठी नमुना म्हणून घेऊन त्यावर पंचांच्या सह्यांचे लेबल लावून सविस्तर पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुध्द प्रस्तुत तक्रार नोंदवली.

३. दाखल तक्रारीवरुन गुन्हा नोंद क्र.९८/२०२४ नोंद करणेत आला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. नमुन्याकामी काढलेली बाटली रासायनिक पृथःकरणासाठी प्रयोगशाळेत पाठविणेत आली. तसेच तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५–ई अन्वये दोषारोप ठेवणेत आला. आरोपीला नि.०९ वर अपराधाचा तपशील समजावून सांगितला. वरील निवेदनाप्रमाणे त्याने गुन्हा कबुल न करता प्रकरण चालविणेचे स्विकारले. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आला असल्यामुळे त्याचा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे जबाब (नि.०९ लगत) नोंदविणेत आला.

५. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणेसाठी फिर्यादी भालेकर (अ.सा.क्र.०३), पंच वैभव (अ.सा.क्र.०१) व जितेंद्र (अ.सा.क्र.०२) या साक्षीदारांस तपासणेत आले. याउलट, आरोपीच्या वतीने कोणताही पुरावा दाखल करणेत आला नाही.

६. अभियोग पक्षाची कथने व आरोपीचा बचाव पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांचे निष्कर्ष त्यावरील कारणमिमांसेसह खालीलप्रमाणेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दि.२९/०५/२०२४ रोजी सकाळी ११.१५ वा. वेळेस अगर त्या सुमारास मौजे कादवण वखारवाडी येथील आरोपीचे राहते घराचे मागे मोकळ्या पडवीत, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथे आरोपी ही तिचे कब्जात विनापरवाना बेकायदेशीररित्या "३५ लीटर मापाचे दोन प्लॅस्टीक कॅन त्यामध्ये ३० लीटर गावठी हातभट्टी दारू अशी एकूण ६० लीटर दारू, १५ लीटर मापाचे बरणीमध्ये १० लीटर दारू, सहा काचेचे ग्लास व एक प्लॅस्टीक बादली" चा मुद्देमाल चोरटा दारु विक्रीचा व्यवसाय करणेच्या उद्देशाने बाळगलेल्या अवस्थेत मिळून आली ? | ...नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :**

७. आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. ए. बैकर व अभियोग पक्षातर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. नाईक यांनी गुणदोषांवर न्यायनिर्णय करणेबाबत युक्तीवाद केला.

८. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणेसाठी फिर्यादी, च पंच साक्षीदार यांना तपासणेत आले.

९. अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेले पंच साक्षीदार क्र.१ वैभव व साक्षीदार क्र.२ जितेंद्र यांनी त्यांचे पुराव्यात दि.२९/०५/२०२४ रोजी

पोलीसांनी पंचनाम्यावरती सही करणेस सांगितलेचे कथन केले आहे. सदर साक्षीदारांना पंचनाम्यातील मजकूराबाबत माहिती नसलेचे तसेच त्यांचेसमक्ष कोणताही पंचनामा झाला नसलेचे कथन केले आहे. सदर दोन्ही साक्षीदारांनी त्याची पंचनाम्यावरील सही ओळखली परंतु त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शवली. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास पाठींबा दिला नाही म्हणून विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले परंतु त्यातून अभियोग पक्षास मदत होईल असे काहीही निष्पन्न झाले नाही.

१०. अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेले साक्षीदार क्र.०३ भालेकर यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले आहे की, मौजे कादवण येथे एका महिलेकडून अवैध देशी–विदेशी दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाल्याने पंचांसह घटनास्थळी गेले. तेथे आरोपी जयश्री जनार्दन कदम हिच्या राहत्या घरात १० लिटर व दोन प्लास्टिक कॅनमध्ये प्रत्येकी ३० लिटर अशी गावठी हातभट्टी दारू मिळून आली. आरोपीने तिचे नाव, पत्ता व घर तिच्या मालकीचे असल्याचे सांगून आधारकार्ड व रेशनकार्ड दाखविले. जप्त मुद्देमालापैकी १८० मिली दारूचा नमुना घेऊन सीलबंद करण्यात आला व उर्वरित मुद्देमाल जप्त करून आरोपीस नोटीस देण्यात आली. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली. सदर साक्षीदाराने त्याचे पुराव्यात फिर्याद (नि.१५) ओळखली.

११. सदर साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान असे कथन केले आहे की, बातमीची खात्री करण्यासाठी त्यांनी तोतया ग्राहक पाठविला नव्हता. तसेच कथित घराच्या क्रमांकाची ग्रामपंचायतीकडून खात्री केली नव्हती.

१२. प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने आरोपीच्या कब्जात विनापरवाना गावठी हातभट्टी दारू मिळून आली हे निःसंशयपणे सिध्द करणे आवश्यक आहे.

**१३.** प्रस्तुत प्रकरणात पंच साक्षीदार क्र.१ वैभव व साक्षीदार क्र.२ जितेंद्र यांनी अभियोग पक्षास पाठींबा न दिल्याने अभियोग पक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणेस असमर्थ ठरला. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त केला हे सिध्द झालेले नाही.

**१४.** त्याचप्रमाणे, प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे फिर्यादीला तपासणेत आलेले आहे. त्याने त्याचे सरतपासात आरोपीचे ताब्यातून बेकायदेशीर गावठी हातभट्टी दारू जप्त केलेचे कथन केले आहे. परंतु त्याचे उलटतपासामध्ये गोपनीय बातमीची खात्री करणेसाठी तोतया गिऱ्हाईक पाठविला नसलेचे कथन केले आहे. सबब, आरोपी दारूविक्री करणेचे उद्देशाने बेकायदेशीर दारू जवळ बाळगून होता या अभियोग पक्षाचे कथनाविषयी संशय निर्माण होतो. त्याचप्रमाणे कथित घराच्या क्रमांकाची ग्रामपंचायतीकडून खात्री केली नसलेचे सदर साक्षीदाराने कबूल केले आहे. सबब, फिर्यादीने आरोपीचे घरावर छापा टाकलेच्या अभियोग पक्षाचे कथनाविषयी संशय निर्माण होतो.

**१५.** महत्वाची बाब अशी की, प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.१२ लगत) दाखल करणेत आलेला आहे. सदर अहवाल भारतीय पुरावा कायद्यान्वये विचारात घेतला तरीही अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा सिध्द केला नसलेने सदर मुद्देमाल आरोपीचे ताब्यातून जप्त केलेचे अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही. तसेच अभियोग पक्षाने नमुना वाहक, तपासिक अधिकारी या महत्त्वपूर्ण साक्षीदारांना तपासलेले नाही. अभियोग पक्षाचे पुराव्यात घटनास्थळ पंचनामा देखिल सिध्द झालेला नाही. तसेच घटनास्थळावरती तोतया ग्राहक पाठवून आरोपी बेकायदेशीर दारूविक्री करीत होता किंवा कसे याची खात्री केलेली नाही. तसेच आरोपी बेकायदेशीर दारू विक्री करीत असलेस कोणत्याही खरेदीदाराचा जबाब नोंदवलेला नाही. सबब, अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन करता प्रस्तुत प्रकरणात आरोपीला दोषी ठरविणेइतपत सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला

नाही. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देणेत येत आहे.

**मुद्दा क्र. २ करीता :**

**१६.** मुद्दा क्र. १ च्या निष्कर्षाचा विचार करीता अभियोग पक्ष आरोपीवर ठेवलेला दोषारोप ठोस पुराव्यानिशी व संशयापलीकडे जाऊन सिध्द करणेस अपयशी ठरला आहे. त्यामुळे वरील सर्व पुराव्याच्या विश्लेषणावरुन आरोपी सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

## आ दे श

१. **आरोपी जयश्री जनार्दन कदम** याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५(ई) या दंडनीय गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करणेत येते.

२. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल अपील कालावधी संपुष्टात आल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी यांचेकडे नियमाप्रमाणे विल्हेवाटीकामी व योग्य कार्यवाहीस्तव पाठविणेत यावा.

३. आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करणेत येत आहे.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रूपये २५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका व जामिनकदबा देऊन पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

AMRUTA CHARUDATTA JOSHI
Digitally signed by AMRUTA CHARUDATTA JOSHI
Date: 2026.07.31 18:01:55 +0530

**ठिकाण – मंडणगड.** **(अमृता चा. जोशी)**

**दिनांक – ३१/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंडणगड.**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
| Court Name | :- | Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri. |
| Name of Stenographer | :- | Shri. A. J. Sagvekar |
| Date of Decision | :- | 31/07/2023 |
| Judgment/order signed by P.O. on | :- | 31/07/2023 |
| Judgment/order uploaded on | :- | 31/07/2023 |